REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

सामाजिक सुधारणांचे प्रणेते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

डॉ. के. बी. शिरसे
सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख,
गोपीकाबाई सीताराम गावंडे महा.उमरखेड जि. यवतमाळ.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी गावातील सामाजिक सुधारणा सर्वांगीन सुधारणा मानली राष्ट्राच्या उन्नतीसाठी ग्रामातील दारिद्रय, अज्ञान, सामाजिक विषमता नष्ट झाल्याशिवाय देश बलवान सशक्त होणार नाही, या विचाराचा प्रचार आणी प्रसार आपल्या भजन व कीर्तनातून केला. त्यांनी नवयुगधर्म प्रेम धर्म सांगीतला. या प्रेमधर्मातून ग्रामे सुधारतील , अस्पृष्यतेचे निर्मूलन होऊन त्यामध्ये त्यांना समता निर्माण होईल, व त्यातून राष्ट्राची उन्नती होईल असे त्यांचे विचार होते. त्यासाठी त्यांनी देशभर व विदेशात सामाजिक समतेचे ज्ञान सांगीतले. व त्यांच्या विचाराचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी गुरुदेव सेवा मंडळ स्थापन केले. त्या मंडळाच्या माध्यमातून त्यांनी आपल्या विचाराचा प्रसार केला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी खंजेरी भजनाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधनाचे कार्य केले. त्यांच्या प्रबोधनामुळे सामाजिक सुधारणांना अनुकुल पार्श्वभुमी तयार झाली.

समाज प्रबोधनाच्या कार्याला व्यापक स्वरुप देण्यासाठी तुकडोजी महाराजांनी एप्रील 1943 साली गुरुदेव मासीक काढले. तसचे संस्थात्मक कार्य करण्यासाठी 11 नोव्हेंबर 1943 रोजी गुरुदेव सेवा मंडळाची स्थापना केली.गुरुदेव सेवा मंडळाचे मुख्य केंद्र अमरावती जिल्ह्यात मोझरी येथे असून सेवा मंडळाच्या शाखा गावागावात स्थापन करण्यात आल्या. गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून ग्रामोद्वार , सामाजीक प्रबोधन , आंधश्रध्दा निर्मुलन, व्यसनमुक्ती ,आखाडा संघटन , गोरक्षण, कुष्ठरोग निवारण, शिक्षण प्रसार, अस्पृष्यता निवारण इत्यादी कार्य केली जात संत तुकडोजी महाराजांचे कार्य बहुआयामी होते. सामाजिक सुधारण।ांचे कार्य करीत असतांना त्यांनी अस्पृश्यता निवारणांच्या कार्याला चालना दिली. राष्ट्रसंत आपल्या भाषणात सांगत–मित्रहो जी गोष्ट जबरदस्तीने दुसऱ्यावर लादली जाते. तिथे गुलामी निर्माण होते. ही मानव जातीची प्रगतीची व्यवस्था नव्हे धर्मचरणाच्या बाबतीत ब्राम्हण असेल पण प्रसंगानुरुप ना भंगी आणि क्षत्रीयही होवू शकेल. मनुष्य प्रगत असो वा अधोगत असो. त्याचा वर्ण जन्मावर अवलंबुन असणे. हा वर्णाश्रम पध्दतीत फार मोठा धोका आहे पुढे ते म्हणतात आपला भारत खंडतुल्य देश आहे. त्याचे सांस्कृतीक रक्षण करावयाचे असल्यास अनेक गोष्टीची दुरुस्ती करावी लागेल. भूतकाळावर लक्ष ठेवणारे लोक नेहमी संस्कृतीची प्रतिष्ठा गात असतात. परंतु बाहेरच्या मानसाला तसे काहीच दर्शन येथे होत नाही. येथील प्राचीन संस्कृती विस्कटलेली आहे, असा त्याला अनुभव येतो, आज विद्वान आणि धर्माधिकारी यांच्या मनात आपल्यापेक्षा कनिष्ठ जाती संबंधी चांगल्या भावना नाहीत. प्रत्येक जन खालला आपल्या सेवेत राबविण्याच्या प्रयत्न करतो. ही समाजाची विकृत अवस्था होय. ती बदलली पाहीजे. जाती, धर्म, संप्रदाय, या वस्तु आम्हाला हव्या आहेत, परंतू त्या आधी दूरुस्त करुन घेतल्या पाहीजेत. ही दूरुस्ती म्हणजे क्रांती ही क्रांती शांततामय मार्गाने त्याग व तपश्यर्चेच्या आधाराने आपणास करावयाची आहे.

तुकडोजी महाराजांचे कार्य हे बहूआयामी होते. सामाजीक सुधारणांचे कार्य करीत असतांना त्यांनी अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याला चालना दिली. राष्ट्रसंत म्हणत दुधकी की जरुरी तुझे फिर क्यो बखाने जान को ? निच उंच छोड दे. त्यांच्या पुढाकाराने बग्गीच्या यात्रेमध्ये सर्वजातीधर्माची पंगत एकत्र बसविण्यात आली. एका वारकरी सत्पुरुषांने तुकडोजी महाराजांना आठरा पगड जातीच्या सामूहीक भोजनाबददल म्हटले की, महाराज हा अधर्म नाही का? त्यावर लगेच तुकडोजी महाराज म्हणाले की, हा अधर्म नाही युगधर्म आहे.

सामाजिक सुधारणानुतन काळाची गरज आहे, हे त्यांनी सनातनी मंडळींना सुचित केले. चातुर्मासात भोजने घालण्याचा प्रघात विदर्भात रुढ होता या भोजनात महाराज अस्पृश्यतेला स्थान देत नसत. कोण ब्राम्हण? कोण महार? कोण मुसलमान? हे पाहीले जात नसत अस्पृश्य समाजाला उपदेश करतांना तुकडोजी महाराज म्हणतात, तुम्ही स्वतःला कमी समजू नका, जे धर्माचरण करतात तेच ब्राम्हण असतात. जन्माचे उच्चनिच न ठरता कर्माने ठरते असा युक्तीवाद करुन त्यांनी अस्पृश्यांना प्रेरीत केले. अस्पृश्यांच्या मुक्ती आंदोलनामध्ये मंदीर प्रवेश चळवळ महत्वाची होती. तुकडोजी महाराजांची मंदीर प्रवेशाबाबत स्पष्ट भुमीका होती. सर्व जाती धर्माच्या लोकांकरीता मंदीरे खुली असली पाहीजेत, मंदीर म्हणजे खाजगी मालमत्ता नव्हे, देवळातील देवावर एखाद्या विशीष्ट जातीच्या लोकांना हक्क नाही. त्यामुळे हरीजनांना देवळात येवू द्या. असे त्यांनी अवाहन केले होते. त्यांनी अमरावतीचे अंबादेवी मंदीर, रामटेक येथील जोगेश्वरी मंदीर अस्पृश्यतेसाठी खुले करण्यासाठी योगदान दिले तसेच गावोगावच्या गुरुदेव मंडळांना सुचित केले की, ज्या मंदीरात अस्पृश्यांना प्रवेश नसेल त्या मंदीरात सार्वजनिक प्रार्थना घेण्यात येवू नये. सहाजिकच गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून अस्पृश्या निमुर्लन कार्याला गती मिळाली सामाजिक सुधारणेला प्रारंभ झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराविषयी तुकडोजी महाराज म्हणतात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर धर्मानिष्ठ पुरुष होते. त्यांनी राग, द्वेषाला घेवून आपला निर्णय घेतला नाही. अत्यंतविचारपुर्वक त्यांनी बौध्द धर्माची निवड केली हजारो वर्षापासून चालत आलेल्या रुढीचे बंध त्यांनी तोडून टाकले मानवी विकासाला वंचीत असलेल्या लाखो पुरुषांना सन्मान प्राप्त करुन दिला. त्यांनी केलेली ही महान क्रांती होय.

तत्वज्ञान धरुन विचारपुर्वक केलेली ही क्रांती आहे. आतताईपणाने हातात काडी घेवून ती केली नाही. मोठेमोठे मंदीर तयार करणे लोक याला पुण्य समजतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यापेक्षा लाखपटीने श्रेष्ठ मानवता मंदीर तयार केले आहे. तुकडोजी महाराजांनी सामाजीक समतेचे विचार व्यक्त करतांना म्हटले आहे की,

या रे या सगळे या करुन दर्शन देवाचे मंडळाच्या प्रार्थनेला सेवकांनो जाऊया भेदभाव सोडूनिया, सर्व गावा लावूया कोण हरिजन आता, कोण ब्राम्हण ? कोण मराठा नि आता कोण इतर जन ? मानवाचा धर्म एक, गाऊया नि पाहूया.

तुकडोजी महाराजांचे सामाजिक कार्य पाहून दलित समाजाने त्यांना आपल्या सभा, परिषदांना निमंत्रीत केल्याचे दिसून येते. मध्यप्रांत–वऱ्हाड नव–मतवादी मातंग समाजाच्या वतीने 12 फेब्रुवारी 1941 रोजी वऱ्हाड मध्यप्रांत महारेत्तर अस्पृश्य परिषदेच्या दुसरे अधिवेशन तळेगांव येथे श्री तुकडोजी महाराज यांच्या अध्यक्षतेखाली झाले. याप्रसंगी भाषण करतांना महाराज म्हणाले हरिजनांनी आपल्या विचारात कृतीत व गृहजीवनातध्दता राखण्याची प्रथम महत्वाकांक्षा बाळगावी. कोणताही महान पुढारी असो तो हरिजनांना भाकरी देऊ 'विकणार नाही. त्याकरीता हरिजनांनी आपसात संघटन करुन दुसऱ्यावर अवलंबुन न राहता आपल्यासाठी उद्योगाची उभारणी केली पाहीजे अनंत काळापासुन क्लेश भोगत असलेल्या हरिजनांच्या उन्नतीचा विचार झाला पाहीजे. सामाजीक समतेची जाणीव करुन देतांना आर्थिक उन्नतीचा मार्ग शोधने आवश्यक असल्याचे प्रतिपादन तुकडोजी महाराज या ठिकाणी करतात.

तुकडोजी महाराजांनी देवदर्शन, धर्माश्यात, आरामधर्म, संस्कार, परधर्म आदी पारंपारीक, धार्मीक चौकटीतील मुद्यांना महाराजांनी आधुनिक पध्दतीने मांडून वर्ण, जाती, यांना विरोध केला. अस्पृश्यता, महोल्लोन्नती, स्त्रिशिक्षणाची गरज, शिक्षण यावर सत्यशोधकी विचाराच्या बरोबरीने महाराजांनी समर्थन केले आहे. आधुनिक शिक्षण व्यवस्थेवर ते म्हणतात. एखाद्या सुंदर बगीच्यात नानारंगाची , नानाआकाराची फुले असतात. त्या फुलामुळे त्या बागेला शोधा येते तसेच या देशाचेही आहे. या देशात नानाधर्माचे पंथाचे पन्नास कोटी लोक राहतात. त्या सर्वांना परस्परांशी प्रेमाने वागता , राहता आले पाहीजेत शिक्षणामुळे ही गोष्ट सहज साध्य झाली पाहीजे. जर जातीजातीत, धर्माधर्मात सुरु असलेल्या भांडणाची गंमत पाहण्याची अक्कल येत असेल तर त्याला मी तरी शिक्षण मानायला तयार नाही. शिक्षणामुळे जीवनाची मुल्ये अधिक चांगली, अधिक उजळ असली पाहीजे. असे झाले तर स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी एक जबाबदार पिढी निर्माण केल्याचे श्रेय आपणा सर्वास मिळेल.

सारांशः

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सकारात्मक मार्गाने अस्पृश्यता, जातीभेद, स्त्रि–पुरुष विषमता, ग्रामीण शोषण, या विरुध्द कार्य केले. राष्ट्रउभारणी, राष्ट्रभक्ती, उद्योगशिलता, शिक्षण, अंधश्रध्दा, रुढी–परंपरा, या मुद्यावर

ग्रामीण जनतेच्या पातळीवर कार्य केले. त्याचबरोबर शैक्षणीक विकास, मुल्यशिक्षण, श्रमप्रतिष्ठा, जातीयता नष्ट करणे, अस्पृश्यता नष्ट करणे, स्त्री–पुरुष समानता प्रस्थापीत करणे, अनिष्ट रुढी, प्रथा, परंपरेच्या विरोधी जनजागृती करणे इत्यादी मुद्यांनी समाजप्रबोधनाचे कार्य केले. इतर संताप्रमाणे तुकडोजी महाराज हे पुजा, प्रार्थना, दान, धर्म, पाप, पुण्य, यज्ञभाग, कर्मकांड या चक्रात अधिक अडकले नाहीत. सामान्य मानसाची समता संवाद ठेवत नवसमाज निर्मीतीचा रथ आपल्या रचनात्मक व प्रबोधन कार्याने पुढे नेण्याचे काम अत्यंत प्रामाणीकपणे शेवटपर्यंत केले

संदर्भसुची :–

1) कडर्वे, रघूनाथ — मानवतेचे पुजारी – राष्ट्रसंत तुकडोजी 2004.
2) बेलुरकर रा. मो. — युगप्रवर्तक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज 2002.
3) सावरकर, सुदाम — जीवन योगी, खंड 3 रा 1984.
4) रामटेके, केशवदास संकलन — राष्ट्रसंत अमृतवाणी (मराठी भाषणे भाग 1) 2020.
5) तुकडोजी महाराज — ग्रामगिता 2002.
6) बाबा – मोहोड संकलन व संपादक — राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराजांची भाषणे, (14 जानेवारी2016)
7) बाबा – मोहोड संकलन व संपादक — राष्ट्रसंताची प्रवचने (14 जानेवारी 2016)
8) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज — युगप्रभात.